महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

तात्काळ / गोपनीय
क्र.पोमसं/२६-ब/स्थापत्य अभियंता/अर्जदार-खान/८८/२०२१. मुंबई, दिनांक ०९/०१/२०२६

प्रति,

वरिष्ठ सहायक संचालक (जाहिरात/प्रशासन),
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन, नविन प्रशासकीय भवन,
१७ वा मजला, मंत्रालयासमोर,
मुंबई - ४०० ०३२.

विषय :- महाराष्ट्र पोलीस दलासाठी निर्माण केलेल्या स्थापत्य उप अभियंता एक पद व स्थापत्य कनिष्ठ अभियंता पाच पदे कंत्राटी पद्धतीने भरण्यासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देण्याबाबत.

********

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र.सीबीई १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं(का.१३), दिनांक १०/०६/२०२५ मधील तरतूदीनुसार पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिपत्याखालील विविध कार्यालयातील विवक्षित कामकाज (बांधकाम विषयक कामकाज) पार पाडण्याकरीता स्थापत्य उप अभियंता व स्थापत्य कनिष्ठ अभियंता यांची ०६ पदे कंत्राटी पद्धतीने भरण्यासाठी जाहिरातीचा मसुदा बृहन्मुंबईमधील तसेच अन्य शहरांमधील जास्त खपाच्या कमीत कमी तीन (दोन मराठी आणि एक इंग्रजी) वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यासाठी पाठविण्यात आला आहे. त्या अनुषंगाने कळविण्यात येते की, १) सदरची जाहिरात मराठी वर्तमानपत्र १. लोकमत, २.लोकसत्ता, ३.महाराष्ट्र टाईम्स आणि इंग्रजी वर्तमानपत्र हिंदुस्थान टाईम्स मध्ये दि. 15/01/2026 रोजी प्रसिध्द करण्यात यावी. २) जाहिरातीचा परिसर मुंबई, मुंबई उपनगर व इतर सर्व जिल्हे ३) जाहिरातीची देयके पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे नांवे काढावे. तरी सदरची जाहिरात प्रसिध्द करुन, तसे या कार्यालयास अवगत करावे, ही विनंती.

09/01/2026

( रामनाथ ल. पोकळे )
विशेष पोलीस महानिरीक्षक (नि. व स.)
पोलीस महासंचालक यांचेकरिता.

प्रत,
पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पोमसं कार्यालय, मुंबई.

२. सोबत जोडलेली माहिती १) अर्जाचा नमुना २) द्यावयाचे प्रतिज्ञापत्र, ३) अ. शैक्षणिक अर्हता, अनुभव व वयोमर्यादा, ब. मासिक परिश्रमिक व भत्ते, क. कर्तव्य व जबाबदाऱ्या, ड. अटी व शर्ती (पृ.१ ते ६) महाराष्ट्र पोलीस वेबसाईटवर दि. 15/01/2026 ते दि. 12/10/2026 सायंकाळी १८.०० वाजेपर्यंत ठेवावी.

Scanned with OKEN Scanner

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयाच्या अधिपत्याखालील कार्यालयांमध्ये बांधकाम विषयक कामासाठी सेवा करार पध्दतीने नेमणूकीसाठी विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहे.

********

**खालील माहिती सोबत जोडली आहे :-**

१. अर्जाचा नमुना

२. अर्जदाराने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र

३. अ) शैक्षणिक अर्हता, अनुभव व वयोमर्यादा,

ब) मासिक परिश्रमिक व भत्ते,

क) कर्तव्य व जबाबदाऱ्या,

ड) अटी व शर्ती.

४. शासन निर्णय, गृह विभाग, क्र.अपीओ-३६१६/प्र.क्र.८८/पोल-३, दि.०९/०१/२०२७ अन्वये मंजूर असलेल्या पदांचे "परिशिष्ट-ब".

Scanned with OKEN Scanner

## अर्जाचा नमुना

| कार्यालयीन उपयोगासाठी<br>१. अर्ज क्रमांक :<br>२. अर्ज स्विकारल्याचा दिनांक :<br>३. अर्ज स्विकारणाऱ्याची स्वाक्षरी (दिनांकासह ):---------------- | २.५ सें.मी. x २.५ सें.मी. आकाराच्या एका फोटोवर स्वाक्षरी करुन या जागी चिकटवावा व दुसरा फोटो स्वाक्षरी करुन अर्जासोबत लिफाप्यात जोडावा. |
| --- | --- |

**सूचना :- अर्जातील अंक फक्त इंग्रजीत लिहावेत.**

**अर्जदाराची वैयक्तीक माहिती :**

१. **अजर्दाराचे संपूर्ण नांव :-** आडनांव नांव वडिलांचे/पतीचे नांव

**मराठीत :** ------------------------------------------------------------------------------------

**इंग्रजीत :** ------------------------------------------------------------------------------------

२. पत्रव्यवहाराचा पत्ता :------------------------------------------------------------------------

तालुका : जिल्हा : पिनकोड :

३. कायमचा पत्ता : ------------------------------------------------------------------

तालुका : जिल्हा : पिनकोड :

४. दूरध्वनी क्रमांक : मोबाईल क्रमांक : -------------

ई-मेल :---------------------------

५. जन्म दिनांक ----------------------------------------- (प्रमाणपत्र सोबत जोडावे.)

६. लिंग :- पुरुष / महिला

Scanned with OKEN Scanner

७. शैक्षणिक अर्हता :-

अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाचे पदविका, पदवी व पदव्युत्तर शिक्षण

| शिक्षण | शैक्षणिक संस्थेचे नांव (महाविद्यालय) | विद्यापिठ | उत्तीर्ण झाल्याचा दिनांक | मिळालेले गुण | मिळालेली टक्केवारी | प्रमाणपत्र |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | प्रमाणपत्र सोबत जोडावे. |

ब) इतर शैक्षणिक अर्हता :-

संगणक प्रशिक्षीत आहे काय? तपशिल : होय / नाही

८. **शासकीय सेवेत स्थापत्य अभियंता पदावर किमान ३ वर्षे नियमित सेवा घेऊन सेवानिवृत्त झालेले अधिकारी यांचा तपशिल :-**

१. शासकीय सेवेत नियुक्त झाल्याचा दिनांक व पदनाम :-

२. शासकीय सेवेत असतांना बांधकाम विभागात केलेल्या सेवेचा कालावधी आणि तपशिल.

३. शासकीय सेवेत असतांना बांधकाम विभागात केलेल्या सेवेचा कालावधी आणि तपशिल

९. अर्जदार म्हणजे करार पध्दतीने नियुक्त करावयाचे सेवानिवृत्त अधिकारी यांच्याविरुध्द कोणताही गुन्हा पोलीस तपासावर आहे काय? तसेच,न्यायालयामध्ये फौजदारी खटला दाखल करण्यात आला आहे काय? कोणतीही विभागीय चौकशीची कार्यवाही चालू किंवा प्रस्तावित आहे काय?: होय / नाही

१०. सध्या मिळत असलेले एकूण सेवानिवृत्ती वेतन :

अर्जदाराची सही

Scanned with OKEN Scanner

## अर्जदाराने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र

मी श्री. / सौ. / कु.------------------------------------------------- याद्वारे प्रतिज्ञापूर्वक असे जाहिर करतो / करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच, विश्वासपूर्वक दिली असून ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. अर्जात नमूद केलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी निवड / नियुक्ती रद्द केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही. अर्जात नमूद केलेली माहिती खोटी अथवा चुकीची असल्यास त्याची पूर्णपणे जबाबदारी माझ्यावर राहील व कायदेशीर कारवाईस मी पात्र ठरेन. मला असेही ज्ञात आहे की, ही नेमणूक फक्त, निव्वळ करार पध्दतीवर आहे व याबाबत माझा कोणताही नोकरी विषयक दावा राहणार नाही. याबाबत उद्भवणारे कोणतेही वादावर मी कोणत्याही कोर्टात दाद मागु शकणार नाही व विशेष पोलीस महानिरीक्षक (नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचा निर्णय अंतिम राहील.

ठिकाण :-

दिनांक :-

अर्जदाराची सही

Scanned with OKEN Scanner

**(अ) पात्रता व अनुभव :-**

१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.सीबीई- १५२५/प्र.क्र. ३७ आस्थामं (का.१३), दि.१०/०६/२०२५ मधील तरतूदीनुसार.

२) भारत सरकार / महाराष्ट्र शासन यांच्या शासकीय / निमशासकीय/ महामंडळे यामधून सेवानिवृत्त झालेले स्थापत्य अभियंता

- **अनुभव :-** पायाभूत सुविधांची अंमलबजावणी, संरचनात्मक देखभाल, बांधकाम विषयक अंदाजपत्रक तयार करणे (CSR/DSR) आणि सावर्जनिक खरेदी (Tendering) मधील अनुभव.

**(ब) मासिक पारिश्रमिक व भत्ते :-**

मासिक पारिश्रमिक :- सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र.सीबीई १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं(का.१३), दिनांक १०/०६/२०२५ मधील परिच्छेद (ड) प्रमाणे राहील.

**(क) कर्तव्य व जबाबदाऱ्या :-**

- **पायाभूत सुविधांचे ऑडीट आणि नोंदवही**
  * जिल्ह्यातील सर्व पोलीस जमिनी, पोलीस ठाणी, चौक्या, निवासी वसाहती, प्रशासकीय इमारती आणि फायरिंग रेंज यांची डिजीटल मालमत्ता नोंदवही (Asset Register) अद्ययावत ठेवणे.
  * पावसाळयापूर्वी दरवर्षी इमारतींची संरचनात्मक स्थिरता (Structural Stability) अग्निसुरक्षा आणि वॉटरप्रूफींग ऑडीट करणे
- **अंदाजपत्रके आणि तांत्रिक मंजुरी :-**
  * प्रचलित जिल्हा दरसूचीनुसार (DSR / PWD CSR) किरकोळ दुरुस्ती, फेरबदल आणि विशेष दुरुस्ती कामांचे सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR), दर विष्लेषण आणि अंदाजपत्रक तयार करणे.
  * पोलीस पायाभूत सुविधा कामांसाठी निविदा दस्तऐवज (Tender Documents), तांत्रिक तपशील आणि मोजमाप वही (Measurement Book- MB) मधील नोंदी प्रमाणिकृत करणे.
- **पर्यवेक्षण आणि गुणवत्ता नियंत्रण :**
  - जिल्हा वार्षिक योजना (DPDC), शासकीय निधी किंवा पोलीस कल्याण निधीतून होणाऱ्या दुरुस्ती व नुतनीकरण कामांवर प्रत्यक्ष देखरेख ठेवणे.
  - वापरल्या जाणाऱ्या साहित्याची गुणवत्ता, काँक्रीटची ताकद आणि भारतीय मानक (BIS) कोडचे पालन होत असल्याचे प्रमाणित करणे.
- **अतिक्रमण निर्मूलन आणि जमीन सीमांकन :**
  - पोलीस जमिनीचे सीमांकन, संरक्षक भिंतीचे बांधकाम आणि अतिक्रमण हटवण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, भूमी अभिलेख विभाग (SLR) आणि महसूल अधिकाऱ्यांशी समन्वय साधणे.
- **अभियांत्रिकी यंत्रणांशी समन्वय :**
  - पोलीस आणि बाह्य यंत्रणा (सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ (MSPHWC), जिल्हाधिकारी कार्यालय, महानगरपालिका / नगरपालिका / ग्रामपंचायत इ.) यांच्यात मुख्य तांत्रिक दुवा म्हणून काम करणे.

Scanned with OKEN Scanner

(ड) अटी व शर्ती :-

(१) करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांच्याविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी. तसेच, सेवानिवृत्त अधिकारी यांच्याविरुध्द कोणताही गुन्हा पोलीस तपासावर नसावा. तसेच,न्यायालयामध्ये फौजदारी खटला दाखल करण्यात आलेला नसावा.

(२) करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितांस शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे / सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार / हक्क नसेल.

(३) करार पध्दतीने नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकाऱ्यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

(४) करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेली नसावी.

(५) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध (Conflict of interest) जाहीर करणे आवश्यक राहील.

(६) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे / माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

(७) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मूल्यमापन करतील.

(८) सदर पदांची नेमणूक ही पूर्णत: करार पध्दतीने असेल. उमेदवाराला शासकीय कर्मचारी / अधिकारी म्हणून गणले जाणार नाही.

(९) सदर कामासाठी करार पध्दतीने देण्यात येणारी प्रथम नियुक्ती एका वेळी जास्तीत जास्त एका वर्षासाठी देण्यात येईल. परंतु अशा नियुक्तीचे आवश्यकतेनुसार वाढीव कालावधीकरीता दरवर्षी नुतनीकरण करण्यात येईल. मात्र, एकूण कालावधी तीन वर्षापेक्षा अधिक असणार नाही.

(१०) निवड केलेला उमेदवार कराराच्या कालावधीत वित्तीय व्यवसायाशी संबंधित कोणत्याही प्रकारचे खाजगी काम / व्यवसाय नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या लेखी परवानगीशिवाय करु शकणार नाही. जर नियुक्ती प्राधिकाऱ्याने सदर बाबतची परवानगी नाकारली असेल आणि परवानगी नाकारल्यावरही उमेदवाराने खाजगी व्यवसाय सुरु ठेवला असेल व तसे करण्याने शासनाच्या कामात व्यत्य किंवा आर्थिक नुकसान होत असेल तर अशा उमेदवारांची नियुक्ती रद्द करण्यात येईल. अशा उमेदवारांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

(११) नियुक्त केलेल्या उमेदवारास या कार्यालयामार्फत देण्यात येणारा करारनामा (Agreement) भरणे अनिवार्य राहील.

(१२) करार पध्दतीने नेमणूक करण्यात येणाऱ्या अधिकाऱ्यांना एकत्रित वेतन आणि अनुज्ञेय दूरध्वनी व प्रवास खर्चाव्यतिरिक्त (उपनिर्दिष्ट मर्यादेपेक्षा) इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाही.

(१३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.सीबीई १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं(का.१३), दि.१०/०६/२०२५ अन्वये करार पध्दतीने नियुंक्ती करण्यात येणा-या व्यक्ती ६५ व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकतील. तथापि, ज्या व्यक्तिच्या सेवा त्यानंतर चालू ठेवणे आवश्यक आहे, असे मत असेल त्यांच्या सेवा सक्षम प्राधिकाऱ्यास एकस्तर वरीष्ठ अधिकाऱ्याच्या/प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने पुढे चालू ठेवता येतील. मात्र, कोणत्याही परिस्थितीत करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्ती वयाच्या ७० व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकतील.

(१४) नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील अशा आशयाचे बंधपत्र / हमीपत्र त्यांच्याकडून घेण्यात येईल. तसेच सदर बंधपत्रात / हमीपत्रात, करार पध्दतीने नियुक्ती देतांना शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटी व शर्ती, विभागाने निश्चित केलेल्या अतिरिक्त अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा, तसेच करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींकडून नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करण्यात येणार नाही, याचा उल्लेख करुन बंधपत्र / हमीपत्र देणे बंधनकारक राहील.

Scanned with OKEN Scanner

## परिशिष्ट "ब"

| अ.क्र. | घटक कार्यालय | पदाचे नाव व संख्या | | पदनिर्मिती केलेल्या शासन निर्णयाचा क्रमांक व दिनांक |
|---|---|---|---|---|
| | | उप अभियंता (१५६००-३९१०० + ५४००) | कनिष्ठ अभियंता (९३००-३४८०० +४३००) | |
| १ | विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र | ०१ | ०१ | गृह विभाग शासन निर्णय क्रमांक अपीओ-३१०८/प्र.क्र.२८४/पोल-३,दि.७.८.२००८ (पोलीस आयुक्त,बृहन्मुंबई यांच्या आस्थापनेवरुन स्थानांतरीत करुन)<br>गृह विभाग शासन निर्णय क्रमांक ३१०९/ ८३६/ प्र.क्र.३४०/पोल-३, दि.३१.१२.२००९ (पोलीस अधीक्षक, धुळे यांच्या आस्थापनेवरुन स्थानांतरीत करुन) |
| २ | विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र | ०१ | ०१ | गृह विभाग शासन निर्णय क्रमांक अपीओ-०१९७/ ३३५५/प्र.क्र.७१/पोल-३, दि.१.७.१९९८ (पोलीस अधीक्षक, नंदुरबार यांच्या आस्थापनेवरुन स्थानांतरीत करुन)<br>गृह विभाग शासन निर्णय क्रमांक अपीओ-३१११/ प्र.क्र.१०७ (अ)/पु.बां.२/पोल-३, दि.४.३.२०१४ (पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण यांच्या आस्थापनेवरुन स्थानांतरीत करुन) |
| ३ | विशेष पोलीस महानिरीक्षक, औरंगाबाद परिक्षेत्र | ०१ | ०१ | गृह विभाग शासन निर्णय क्रमांक रापोसे-०५/ २००१/प्र.क्र.१६२/पोल-१ अ, दि.५.७.२००१ (पोलीस अधीक्षक,औरंगाबाद यांच्या आस्थापनेवरुन स्थानांतरीत करुन)<br>गृह विभाग शासन निर्णय क्रमांक ३१०९/८३६/ प्र.क्र.३४०/पोल-३, दि.३१.१२.२००९ (पोलीस अधीक्षक, हिंगोली यांच्या आस्थापनेवरुन स्थानांतरीत करुन) |
| ४ | विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र | ०१ | ०१ | गृह विभाग शासन निर्णय क्रमांक रापोसे-०५/ २००१/प्र.क्र.१६२/पोल-१अ, दि.०५.०७.२००१ (पोलीस अधीक्षक,जालना यांच्या आस्थापनेवरुन स्थानांतरीत करुन) |



Scanned with OKEN Scanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | गृह विभाग शासन निर्णय क्रमांक अेपीओ-३११०/ प्र.क्र.४२८/पोल-३, दि.२५.०७.२०११ (पोलीस अधीक्षक,जळगांव यांच्या आस्थापनेवरुन स्थानांतरीत करुन) |
| ५ | विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र | ०१ | ०१ | गृह विभाग शासन निर्णय क्र. ३१०९/ ८३६/ प्र.क्र.३४०/पोल-३, दि.३१.१२.२००९ (पोलीस अधीक्षक,गडचिरोली यांच्या आस्थापनेवरुन स्थानांतरीत करुन)<br><br>गृह विभाग शासन निर्णय क्र.अेपीओ-३११०/ प्र.क्र.४२८/पोल-३, दि.२५.०७.२०११ ( पोलीस अधीक्षक,गोंदिया यांच्या आस्थापनेवरुन स्थानांतरीत करुन) |
| ६ | विशेष पोलीस महानिरीक्षक, नांदेड परिक्षेत्र | ०१ | ०१ | गृह विभाग शासन निर्णय क्र.अेपीओ-०१९३/ प्र.क्र.१५/ पोल-३, दि.२९.०१.१९९३ (पोलीस अधीक्षक,नांदेड यांच्या आस्थापनेवरुन स्थानांतरीत करुन)<br><br>गृह विभाग शासन निर्णय क्र.अेपीओ-०१९३/ प्र.क्र.१५/पोल-३, दि.२९.०१.१९९३ (पोलीस अधीक्षक,अकोला यांच्या आस्थापनेवरुन स्थानांतरीत करुन) |
| ७ | विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र | ०१ | ०१ | गृह विभाग शासन निर्णय क्र.रापोसे-०५/ २००१/ प्र.क्र.१६२/पोल-१अ/दि.०५०७.२००१ (पोलीस अधीक्षक,वाशिम यांच्या आस्थापनेवरुन स्थानांतरीत करुन)<br><br>गृह विभाग शासन निर्णय क्र.अेपीओ-३१११/ प्र.क्र.१०७(अ)/पु.बां.२/पोल-३,दि.४.३.२०१४ (पोलीस अधीक्षक,चंद्रपूर यांच्या आस्थापनेवरुन स्थानांतरीत करुन) |
| ८ | पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई | --- | ०२ | गृह विभाग शासन निर्णय क्रमांक अेपीओ-३१११/ प्र.क्र.१०७(अ)/ पु.बां.२/ पोल-३, दि.४.३.२०१४ (पोलीस आयुक्त, पुणे शहर यांच्या आस्थापनेवरुन स्थानांतरीत करुन)<br>गृह विभाग शासन निर्णय क्रमांक अेपीओ-३१११/ |



Scanned with OKEN Scanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | प्र.क्र.१०७(अ)/ पु.बां.२/ पोल-३, दि.४.३.२०१४ (पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांच्या आस्थापनेवरुन स्थानांतरीत करुन) |
| ९ | पोलीस आयुक्त, पुणे शहर | --- | ०२ | गृह विभाग शासन निर्णय क्रमांक अेपीओ-३१११/ प्र.क्र.१०७(अ)/ पु.बां.२/ पोल-३, दि.४.३.२०१४ |
| १० | पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण | --- | ०१ | गृह विभाग शासन निर्णय क्रमांक अेपीओ-३१११/ प्र.क्र.१०७(अ)/पु.बां.२/पोल-३, दि.४.३.२०१४ |
| ११ | पोलीस आयुक्त, नागपूर शहर | --- | ०१ | गृह विभाग शासन निर्णय क्रमांक एमआयएस-०१०४/प्र.क्र.७७/१/पोल-८, दि.१२.०७.२००४ |
| १२ | पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण | --- | ०१ | गृह विभाग शासन निर्णय क्रमांक ३१०९/ ८३६/ प्र.क्र.३४०/ पोल-३, दि.३१.१२.२००९ |
| १३ | पोलीस आयुक्त, ठाणे शहर | --- | ०२ | गृह विभाग शासन निर्णय क्रमांक अेपीओ-३१११/ प्र.क्र.१०७(अ)/ पु.बां.२/ पोल-३, दि.४.३.२०१४ |
| १४ | पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण | --- | ०१ | गृह विभाग शासन निर्णय क्रमांक अेपीओ-३४८२/ २५३१३/९७/पोल-३, दि.१७.०५.१९८२ |
| १५ | पोलीस अधीक्षक, पालघर | --- | ०१ | गृह विभाग शासन निर्णय क्रमांक अेपीओ/ ०३१४/ प्र.क्र.४७/पोल-३, दि.२२.०४.२०१५ |
| १६ | पोलीस आयुक्त, नाशिक शहर | --- | ०१ | गृह विभाग शासन निर्णय क्रमांक अेपीओ-३१११/ प्र.क्र.१०७(अ)/ पु.बां.२/पोल-३, दि.४.३.२०१४ |
| १७ | पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण | --- | ०१ | गृह विभाग शासन निर्णय क्रमांक अेपीओ-३१११/ प्र.क्र.१०७(अ)/ पु.बां.२/ पोल-३, दि.४.३.२०१४ |
| १८ | पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर | --- | ०१ | गृह विभाग शासन निर्णय क्रमांक अेपीओ-३१११/ प्र.क्र.१०७(अ)/ पु.बां.२/ पोल-३, दि.४.३.२०१४ |
| १९ | पोलीस अधीक्षक, औरंगाबाद ग्रामीण | --- | ०१ | गृह विभाग शासन निर्णय क्रमांक ३१०९/ ८३६/ प्र.क्र.३४०/पोल-३, दि.३१.१२.२००९ |
| २० | पोलीस आयुक्त, सोलापूर शहर | --- | ०१ | गृह विभाग शासन निर्णय क्रमांक अेपीओ-३१११/ प्र.क्र.१०७(अ)/ पु.बां.२/ पोल-३, दि.४.३.२०१४ |
| २१ | पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण | --- | ०१ | गृह विभाग शासन निर्णय क्रमांक जीआरडी-१९०/ सीआर-९७/पोल-१०, दि.२८.०९.१९९० |
| २२ | पोलीस आयुक्त, अमरावती शहर | --- | ०१ | गृह विभाग शासन निर्णय क्रमांक अेपीओ-३१११/ प्र.क्र.१०७(अ)/ पु.बां.२/ पोल-३, दि.४.३.२०१४ |
| २३ | पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण | --- | ०१ | गृह विभाग शासन निर्णय क्रमांक ३१०९/ ८३६/ प्र.क्र.३४०/पोल-३, दि.३१.१२.२००९ |
| २४ | पोलीस आयुक्त, नवी मुंबई | --- | ०१ | गृह विभाग शासन निर्णय क्रमांक अेपीओ-३५१४/प्र.क्र.१०/पोल-३, दि.२०.०५.२०१५ |
| २५ | पोलीस अधीक्षक, रायगड | --- | ०१ | गृह विभाग शासन निर्णय क्रमांक अेपीओ-३६५/ प्र.क्र.३अ/पोल-३, दि.१७.०२.२००६ |



Scanned with OKEN Scanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २६ | पोलीस अधीक्षक, रत्नागिरी | --- | ०१ | गृह विभाग शासन निर्णय क्रमांक पीएनएम-०३९७/सीआर-४७४/पोल-५(ब), दि.१५.७.२००० |
| २७ | पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग | --- | ०१ | गृह विभाग शासन निर्णय क्रमांक अेपीओ-३६५/ प्र.क्र.३ अ/पोल-३, दि.१७.०२.२००६ |
| २८ | पोलीस अधीक्षक, कोल्हापूर | --- | ०१ | गृह विभाग शासन निर्णय क्रमांक अेपीओ-३१११/प्र.क्र.१०७(अ)/पु.बां.२/पोल-३, दि.४.३.२०१४ |
| २९ | पोलीस अधीक्षक, सातारा | --- | ०१ | गृह विभाग शासन निर्णय क्रमांक अेपीओ-३१११/ प्र.क्र.१०७(अ)/ पु.बां.२/ पोल-३, दि.४.३.२०१४ (पोलीस आयुक्त,सोलापूर शहर यांच्या आस्थापनेवरुन स्थानांतरीत करुन) |
| ३० | पोलीस अधीक्षक, सांगली | --- | ०१ | गृह विभाग शासन निर्णय क्रमांक अेपीओ-३१११/ प्र.क्र.१०७(अ)/ पु.बां.२/ पोल-३, दि.४.३.२०१४ |
| ३१ | पोलीस अधीक्षक, अहमदनगर | --- | ०१ | गृह विभाग शासन निर्णय क्रमांक ३१०९/ ८३६/प्र.क्र.३४०/पोल-३, दि.३१.१२.२००९ |
| ३२ | पोलीस अधीक्षक, धुळे | --- | ०१ | गृह विभाग शासन निर्णय क्रमांक अेपीओ-३१११/ प्र.क्र.१०७(अ)/ पु.बां.२/ पोल-३, दि.४.३.२०१४ |
| ३३ | पोलीस अधीक्षक, नंदुरबार | --- | ०१ | गृह विभाग शासन निर्णय क्रमांक अेपीओ-०११७/ ३३५५/प्र.क्र.७१/पोल-३, दि.१.७.१९९८ |
| ३४ | पोलीस अधीक्षक, जळगाव | --- | ०१ | गृह विभाग शासन निर्णय क्रमांक अेपीओ-३११०/प्र.क्र.४२८/पोल-३, दि.२५.०७.२०११ |
| ३५ | पोलीस अधीक्षक, जालना | --- | ०१ | गृह विभाग शासन निर्णय क्रमांक अेपीओ-३१११/ प्र.क्र.१०७(अ)/ पु.बां.२/ पोल-३, दि.४.३.२०१४ |
| ३६ | पोलीस अधीक्षक, बीड | --- | ०१ | गृह विभाग शासन निर्णय क्रमांक अेपीओ-३१११/ प्र.क्र.१०७(अ)/ पु.बां.२/ पोल-३, दि.४.३.२०१४ |
| ३७ | पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद | --- | ०१ | गृह विभाग शासन निर्णय क्रमांक ३१०९/ ८३६/ प्र.क्र.३४०/पोल-३, दि.३१.१२.२००९ |
| ३८ | पोलीस अधीक्षक, नांदेड | --- | ०१ | गृह विभाग शासन निर्णय क्र.अेपीओ-३११०/ प्र.क्र.४२८/पोल-३, दि.२५.०७.२०११ |
| ३९ | पोलीस अधीक्षक, लातूर | --- | ०१ | गृह विभाग शासन निर्णय क्रमांक अेपीओ-३१११/ प्र.क्र.१०७(अ)/ पु.बां.२/ पोल-३, दि.४.३.२०१४ |
| ४० | पोलीस अधीक्षक, परभणी | --- | ०१ | गृह विभाग शासन निर्णय क्र. ३१०९/ ८३६/ प्र.क्र.३४०/पोल-३, दि.३१.१२.२००९ |
| ४१ | पोलीस अधीक्षक, हिंगोली | --- | ०१ | गृह विभाग शासन निर्णय क्रमांक ३१०९/ ८३६/ प्र.क्र.३४०/पोल-३, दि.३१.१२.२००९ |
| ४२ | पोलीस अधीक्षक, अकोला | --- | ०१ | गृह विभाग शासन निर्णय क्र.अेपीओ-०१९३/ प्र.क्र.१५/पोल-३, दि.२९.०१.१९९३ |
| ४३ | पोलीस अधीक्षक, वाशिम | --- | ०१ | गृह विभाग शासन निर्णय क्रमांक अेपीओ-३१११/ प्र.क्र.१०७(अ)/ पु.बां.२/ पोल-३, दि.४.३.२०१४ |



Scanned with OKEN Scanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४४ | पोलीस अधीक्षक, बुलढाणा | --- | ०१ | गृह विभाग शासन निर्णय क्रमांक ३१०९/ ८३६/ प्र.क्र.३४०/पोल-३, दि.३१.१२.२००९ |
| ४५ | पोलीस अधीक्षक, यवतमाळ | --- | ०१ | गृह विभाग शासन निर्णय क्रमांक ३१०९/ ८३६/ प्र.क्र.३४०/पोल-३, दि.३१.१२.२००९ (पोलीस अधीक्षक,वर्धा यांच्या आस्थापनेवरुन स्थानांतरीत करुन) |
| ४६ | पोलीस अधीक्षक, चंद्रपूर | --- | ०१ | गृह विभाग शासन निर्णय क्रमांक अेपीओ-३१११/ प्र.क्र.१०७(अ)/ पु.बां.२/ पोल-३, दि.४.३.२०१४ |
| ४७ | पोलीस अधीक्षक, भंडारा | --- | ०१ | गृह विभाग शासन निर्णय क्र. ३१०९/ ८३६/प्र.क्र.३४०/पोल-३, दि.३१.१२.२००९ |
| ४८ | पोलीस अधीक्षक, वर्धा | --- | ०१ | गृह विभाग शासन निर्णय क्र. ३१०९/ ८३६/प्र.क्र.३४०/पोल-३, दि.३१.१२.२००९ |
| ४९ | पोलीस अधीक्षक, गडचिरोली | --- | ०१ | गृह विभाग शासन निर्णय क्र. ३१०९/ ८३६/प्र.क्र.३४०/पोल-३, दि.३१.१२.२००९ |
| ५० | पोलीस अधीक्षक, गोंदिया | --- | ०१ | गृह विभाग शासन निर्णय क्र.अेपीओ-३११०/ प्र.क्र.४२८/पोल-३, दि.२५.०७.२०११ |
| एकुण | | ०७ | ५३ | |

Scanned with OKEN Scanner